RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ३, अंक ६८(५)] बुधवार, जून ७, २०१७/ज्येष्ठ १७, शके १९३९ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १४९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ जून २०१७

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक बीपीए. ११७/प्र.क्र. २२/राउशु-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने असा विचार केला की, महाराष्ट्र ग्रामरक्षक दल नियम, २०१७ मधील खालील नियमामध्ये सुधारणा करण्यात येऊन, ताबडतोब अंमलात आणणे आवश्यक आहे, म्हणून हे नियम मुंबई दारुबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५) च्या कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतूकामधील तरतुदीनुसार आधी प्रसिद्ध न करता करण्यात यावे.

त्याअर्थी, आता, मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १४३ च्या पोट-कलम (३) मधील परंतूकाद्वारे त्याचप्रमाणे पोट-कलम (२) चे खंड (क्ष), (य), व (ज्ञ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढील नियमात सुधारणा करीत आहे :—

१. या नियमांना महाराष्ट्र ग्रामरक्षक दल (सुधारणा) नियम, २०१७ असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र ग्रामरक्षक दल नियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा " प्रधान नियम " असा निर्देश करण्यात आला आहे) मधील नियम ४ मध्ये,

(*i*) उप नियम (३) मध्ये " ५० टक्के " या अंक आणि शब्दाऐवजी " २५ टक्के "असा अंक व शब्द समाविष्ट करण्यात यावा.

(*ii*) उप नियम (३) नंतर, खालील परंतूक समाविष्ट करण्यात येत आहे :—

जर का विशेष ग्रामसभेच्या बैठकीमध्ये, ग्रामरक्षक दल स्थापन करण्यात आले नाही तर, पुढील ग्रामसभेच्या बैठकीमध्ये ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्यात येईल.

३. प्रधान नियमातील नियम ६ मध्ये,–

(*i*) " ५० टक्के " या अंक आणि शब्दाऐवजी " २५ टक्के " असा अंक व शब्द समाविष्ट करण्यात यावा.

(*ii*) उप नियम (३) नंतर, खालील परंतूक समाविष्ट करण्यात येत आहे :–

जर का विशेष महिला ग्रामसभेच्या बैठकीमध्ये, ग्रामरक्षक दल स्थापन करण्यात आले नाही तर, पुढील महिला ग्रामसभेच्या बैठकीमध्ये ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. हि. वागदे,**
शासनाचे सह सचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 6th June 2017

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. BPA. 0117/C.R.22/EXC-3.—Whereas the Government of Maharashtra considers it expedient that the following rules to amend into force at one, and therefore, the rules should be made without previous publication provided by the proviso to sub-section (*3*) of Section 143 of the Bombay Prohibition Act, 1949 (Bom. XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses (x), (y) and (z) of sub-section (*2*) read with the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Bombay Prohibition Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Gram Rakshak Dal rules, 2017, follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Gram Rakshak Dal (Amendment) Rules, 2017.

2. In rule 4 of the Maharashtra Gram Rakshak Dal Rules, 2017 (hereinafter referred to as "the principal Rules"),—

(*i*) In sub-rule (*3*) for the figures and words "50 per cent." the figures and words "25 per cent." shall be substituted.

(*ii*) after the sub rule (*3*), the following proviso shall be added, namely :—

Provided that, if in the meeting of the Special Gramsabha, the Gram Rakshak Dal is not established, then Gram Rakshak Dal shall be established in the meeting of the next Gramsabha.

3. In rule 6 of the Principal Rules,—

(*i*) in sub-rule (*3*), for the figures and words "50 per cent." the figures and words "25 per cent." shall be substituted ;

(*ii*) after sub-rule (*3*), the following proviso shall be added, namely :—

Provided that, if in the meeting of the Women Special Gramsabha, the Gram Rakshak Dal is not established, then Gram Rakshak Dal shall be established in the next Women Gramsabha.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. H. WAGDE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.